# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

## प्रसिद्धीपत्रक

### पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा फेब्रुवारी २०१८
### अंतिम निकाल व गुणवत्ता यादीबाबतची संक्षिप्त माहिती

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - ०१ मार्फत रविवार दि. १८ फेब्रुवारी, २०१८ रोजी घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतिम निकाल सोमवार दिनांक ०६/०८/२०१८ रोजी दु. ०३.०० वाजता परिषदेच्या www.mscepune.in आणि http://puppss.mscescholarshipexam.in या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला आहे. सदर परीक्षेची सांख्यिकीय माहिती खालीलप्रमाणे आहे.

| परीक्षेचे नाव | नोंदविलेले विद्यार्थी | उपस्थित विद्यार्थी | अनुपस्थित विद्यार्थी | पात्र विद्यार्थी | शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी | शेकडा निकाल (पात्र विद्यार्थी संख्येनुसार) |
|---|---|---|---|---|---|---|
| पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी ) | ४८८८५१ | ४७२६१० | १६२४१ | १०८५६० | १६५९३ | २२.९७% |
| पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) | ३७०२४३ | ३५८८४८ | ११३९५ | ४५१०३ | १३७५९ | १२.५७% |
| **एकुण** | **८५९०९४** | **८३१४५८** | **२७६३६** | **१५३६६३** | **३०३५२** | **१८.४८%** |

दि. १८ फेब्रुवारी, २०१८ रोजी झालेल्या पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतरिम (तात्पुरता) निकाल दिनांक २१/०६/२०१८ रोजी जाहीर करण्यात आला होता. दि. २१/०६/२०१८ ते दि. १०/०७/२०१८ या कालावधीत गुणपडताळणीसाठीचे अर्ज संबंधित शाळेमार्फत ऑनलाईन मागविण्यात आले होते. परिषदेकडे विहित मुदतीत ऑनलाईन आलेल्या परिपूर्ण अर्जांवरुन संबंधित विद्यार्थ्यांच्या गुणांची पडताळणी करुन गुणपडताळणीसाठी आलेले अर्ज निकाली काढून या परीक्षांचा अंतिम निकाल तयार करण्यात आला आहे. या अंतिम निकालावरुन शासनमान्य मंजूर संचाच्या अधीन राहून विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी (शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची यादी) तयार करण्यात आली आहे.

या परीक्षेतील मंजूर संच व शिष्यवृत्तीधारक ठरलेल्या विद्यार्थ्यांची संख्या खालील तक्त्यात दिली आहे.

| अ.क्र. | संच प्रकार | इयत्ता ५ वी | | इयत्ता ८ वी | |
|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर संच | प्रत्यक्षात संचधारक विद्यार्थी संख्या | मंजूर संच | प्रत्यक्षात संचधारक विद्यार्थी संख्या |
| १ | संच E (राष्ट्रीय ग्रामीण) | ३४० | ३४० | ३४० | ३४० |
| २ | संच J (ग्रामीण सर्वसाधारण) | ८१२४ | ८१२४ | ६६५० | ५९७२ |
| ३ | संच K (शहरी सर्वसाधारण) | ७८६३ | ७७९८ | ६४३० | ६२८० |
| ४ | संच F (सर्वसाधारण मुले/मुली) | २४३ | २४३ | १४५ | ५८ |
| ५ | संच G (सर्वसाधारण मुली) | १९ | १६ | २२ | ०३ |
| ६ | संच H (मागासवर्गीय मुले/मुली) | ९३ | ६५ | १७ | ०२ |
| ७ | संच I (मागासवर्गीय मुली) | ११ | ०७ | १४ | ०१ |
| | तालुकास्तरीय शिष्यवृत्ती संच | | | | |
| ८ | संच A (ग्रामीण सर्वसाधारण) | - | - | १३८९ | ८०२ |
| ९ | संच B (ग्रामीण अनुसूचीत जाती) | - | - | ४३४ | १६७ |
| १० | संच C (ग्रामीण भूमिहीन शेतमजूराचा पाल्य) | - | - | ९५५ | १०८ |
| ११ | संच D (ग्रामीण आदिवासी) | - | - | १९२ | २६ |
| | **एकुण** | **१६६९३** | **१६५९३** | **१६६८८** | **१३७५९** |

- **अंतिम निकाल प्राप्त करणे -**

अंतिम निकाल परिषदेच्या www.mscepune.in व http://puppss.mscescholarshipexam.in या संकेतस्थळावर सदर परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यास वैयक्तिकरित्या स्वतःचा बैठक क्रमांक व आईचे नाव टाकून पाहता येईल. तसेच शाळेस त्यांच्या लॉगीनमध्ये शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचा निकाल एकत्रितपणे पाहता येईल.

- **संकेतस्थळावरील प्रसिद्ध करण्यात आलेली शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची माहिती, तसेच इतर अनुषंगिक माहितीच्या Links खालीलप्रमाणे**

१. अंतिम निकाल (विद्यार्थ्यांसाठी)
२. गुणवत्ता यादी (राज्यस्तरीय / जिल्हास्तरीय / तालुकास्तरीय)
३. शाळा सांख्यिकीय माहिती (जिल्हानिहाय / तालुकानिहाय)
४. निकाल गोषवारा पुस्तिका (इयत्तनिहाय)

विद्यार्थी, पालक, शाळा, क्षेत्रिय अधिकाऱ्यांना वरीलपैकी कोणत्याही हव्या असलेल्या लिंकवर क्लिक करुन माहिती प्राप्त (DOWNLOAD) करुन घेता येईल.

- **गुणवत्ता यादीत कोणाचा समावेश नाही -**

१. शासनमान्य मंजूर शिष्यवृत्ती संचांची संख्या मर्यादित असल्याने कटऑफ शेकडा गुणांइतके एकुण शेकडा गुण मिळूनही प्रचलित निकषांची पूर्तता न करणारे विद्यार्थी.
२. मान्यताप्राप्त नसलेल्या शाळांमधून (अनधिकृत शाळांमधून) परीक्षेस प्रविष्ट झालेले विद्यार्थी.
३. विहित कमाल वयोमर्यादेपेक्षा अधिक वयाचे विद्यार्थी.

४. परीक्षेतील गैरप्रकारात समाविष्ट विद्यार्थी.

५. परीक्षेस ओ-फॉर्म भरुन प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांपैकी शुल्क न भरलेले विद्यार्थी.

- **गुणपत्रक / प्रमाणपत्रांच्या डिजीटल प्रतीसंबंधी -**

१. परिषदेने संकेतस्थळावर अंतरिम (तात्पुरते) गुणपत्रक दिनांक २१ जून, २०१८ रोजी व अंतिम गुणपत्रक (संकेतस्थळावरील प्रत) दिनांक ०६ ऑगस्ट, २०१८ रोजी उपलब्ध करुन दिले आहे.

२. शिष्यवृत्ती परीक्षेत प्रविष्ठ झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे गुणपत्रक/प्रमाणपत्रांच्या छापील प्रती दि. २७/०८/२०१८ रोजीपर्यंत संबंधित जिल्हयाच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना पोहोच करण्यात येतील.

३. शिष्यवृत्ती परीक्षेत प्रविष्ठ झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे गुणपत्रक/प्रमाणपत्रांच्या छापील प्रती संबंधित गटशिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी यांच्या मार्फत सर्व शाळांना दि. ०१/०९/२०१८ रोजीपर्यंत पोहोच करण्यात येतील.

४. तसेच गुणपत्रक / प्रमाणपत्राची डिजीटल प्रत संबंधित शाळेच्या लॉगीनमध्ये दि. १४/०८/२०१८ रोजी उपलब्ध करुन देण्यात येईल. शाळेने विद्यार्थ्यांच्या गुणपत्रक / प्रमाणपत्रंच्या डिजीटल प्रती डाऊनलोड करुन सॉफ्टकॉपीच्या स्वरुपात आपल्या दप्तरी कायमस्वरुपी जतन करुन ठेवाव्यात व विद्यार्थी / पालकांच्या मागणीनुसार उपलब्ध करुन द्याव्यात.

५. राज्य गुणवत्ता यादीतील (शहरी / ग्रामीण / सीबीएसई - आयसीएसई) विद्यार्थ्यांची छापील प्रमाणपत्रे दि. ०९/०८/२०१८ रोजीपर्यंत संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना उपलब्ध करुन दिली जातील.

- **महत्त्वाचे**

१. सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून रद्द झालेल्या प्रश्नांचे गुण कमी करुन उर्वरित अचूक प्रश्नांच्या प्राप्त गुणांवरुन शेकडा गुण काढण्यात आले आहेत. सदर एकुण शेकडा गुणांवरुन गुणवत्ता याद्या निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

२. ऑनलाईन आवेदनपत्रात चुकीची/खोटी माहिती भरुन शिष्यवृत्ती अर्हता प्राप्त झाल्याचे निदर्शनास आल्यास अशा शाळा प्रमुखांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित केली जाईल. तसेच अशा विद्यार्थ्यांची अर्हता रद्द केली जाईल.

३. शिष्यवृत्ती रक्कम प्रदान करण्याबाबत मा. संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे गुणवत्ता यादीतील संबंधित विद्यार्थ्यांची शिफारस करण्यात येत आहे.

हे प्रसिद्धीपत्रक परिषदेच्या www.mscepune.in व http://puppss.mscescholarshipexam.in संकेतस्थळावरही उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**दिनांक - ०६ ऑगस्ट, २०१८.**

(सुखदेव डेरे)
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - १**